एमएचपीए०७-००००००७-२०२०

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ०१/२०२० मधील निशाणी १ वरील हुकुम</u>**

**(मयुर व ईतर वि. आरती)**

**(पारीत (passed) केलेची तारीख : ०८/०३/२०२१)**

१. अर्जदार व तर्फे वकील वारंवार पुकारता गैरहजर आहेत.

२. अर्जदारांस दिनांक ०४/०२/२०२१ व १५/०२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार युक्तीवादासाठी व तजविजसाठी अंतिम संधी देण्यात आली होती.

३. अर्जदारांनी दिनांक १५/०२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार खर्चाची रक्कम जमा करुन व दिनांक ०४/०२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार सदरचा अर्ज पुढे चालविण्याबाबत काहीही तजवीज केलेली नाही. यावरुन अर्जदार यांस सदरचा अर्ज चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसुन येते.

४. अर्जदार यांना या अर्जामध्ये युक्तीवादासाठी व तजविजसाठी पुरेशी संधी देण्यात आली होती. तथापि, आज रोजी अर्जदार गैरहजर असुन आज पावेतो अर्जदाराने युक्तीवादासाठी काहीही तजवीज केलेली नाही. यावरुनही अर्जदार यांना सदरचा अर्ज चालविण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसुन येते.

५. अर्जदारा तर्फे कसलाही अर्ज आज रोजी देण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज तहकुब करण्याची अजिबात आवश्यकता नाही.

६. सबब, सदरचा अर्ज विना चौकशी रद्द (Dismissed in default) करण्यात येत आहे.

७. खर्चाबाबत काही आदेश नाही.

Digitally signed by Mahesh Balkrishna Lambe
Date: 2021.03.09 14:58:49 +0530

दिनांक : ०८/०३/२०२१.

(महेश बा. लंबे)
जिल्हा न्यायाधीश-१,
बसमतनगर.